**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१५/२०१२</u>**

(आनंदा बाबुराव पाटील वि. राजाराम बाबुराव पाटील व इतर.)

## <u>निशाणी क्र. ११५ खालील आदेश</u>

(पारित दिनांक – २०/०२/२०२४)

वादीतर्फे मुखत्यार यांनी सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र.३ विरुध्द दावा रद्द (abate) झालेबाबतचा आदेश रद्द होणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार, प्रतिवादी क्र.३ हे दि.२५/०६/२०२२ रोजी मयत झाले असून, प्रतिवादी क्र.३ हे गावात मयत न होता, कालवडे, ता.कराड येथे मयत झाले असून वेळीच मृत्यूचा उतारा मिळाला नाही. सदर कारणामुळे सदरचे वारस अभिलेखावर घेता आले नाहीत, त्यामुळे प्रतिवादी क्र.३ यांचेविरुध्द प्रस्तुत दावा अबेट करण्यात आला. सदरचा आदेश रद्द होणेची वादीने विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला.

४. वादी व प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रतिवादी क्र.३ हे दि.२५/०६/२०२२ रोजी मयत झाले असून, तसेच मयत झालेबाबत त्यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. सदर, दावा गहाणफेडीसाठी व सरसनिरस मानाने वाटप करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर दावा गुणांवगुणावर निर्णीत होण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. नि.११५ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.३ विरुध्द दावा अबेट झालेचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

ठिकाण– कराड (श्रीमती पी.एस.भोसले)

दिनांक– २०/०२/२०२४ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कराड.